INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# "भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन : एक दृष्टिकोन"
# (Rewriting Indian History: A Perspective)

**प्रा.डॉ.आर.ए. चव्हाण**
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड (महाराष्ट्र, भारत)
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2025-32636424/IRJHIS2505018

**प्रस्तावना :**

इतिहास ही कला नसून शास्त्र आहे. शास्त्रामध्ये ज्या पध्दतीचे अवलंब करतात अशा पध्दतीचा व प्रक्रियाचा इतिहास लेखनात वापर केला पाहिजे. इतिहासाचा संबंध भूतकाळाशी असतो. भूतकाळ हा लिखित किंवा अलिखित संदर्भ साधनामध्ये गुरफटून पडलेला असतो. अलिखित संदर्भ साधने ही तर महत्वाची आहेतच पण इतिहासलेखन प्रामुख्याने कागदपत्रावर आधारित असतो. प्रो. लॉजिलॉस व सेन बॉस यांच्या, "No Documents No History" या उक्ती बाबत कोणताही संशय असल्याचे कारण नाही. इतिहासातील दुर्बोधपणा अनाकलनीयता व अकल्पीतपणा इत्यादी दोष नाहीसे होवून इतिहास हे एक आकरिक शास्त्र Formal Science आहे. हे सिध्द होईल. इतिहासाचा अन्वयार्थ लावताना शास्त्रशुध्द पध्दतीनेच लावला पाहिजे व त्याचे निष्कर्ष काढले पाहिजे. नव्या संदर्भावर इतिहास हा वारंवार लिहिला जावा ज्याप्रमाणे इतिहासामध्ये सुध्दा नित्य नवे नवे संशोधन होत असते म्हणून इतिहासाचे पुनर्लेखन ही अत्यंत महत्वाची बाब ठरते म्हणून ठराविक कालानंतर इतिहासाचे पुनर्लेखन होणे आवश्यक आहे. काही घटनांच्या बाबतीत जे गैरसमज असतात ते दूर होण्यास अनुकुल अशी परिस्थिती निर्माण होते. ज्यावेळी अशी संदर्भ साधने उपलब्ध होतात तेव्हा ज्या भागाचा इतिहास लिहिणे जास्त सोयीस्कर होते. अर्थातच गतकाळातील घटना प्रसंगाचे नव्या साधनाच्या आधारे पुन्हा लेखन करणे म्हणजेच इतिहासाचे पुनर्लेखन होय. असमकालीन घटनांच्या बाबत मात्र त्याला कागदपत्रांवरच अवलंबून राहावे लागते. इतिहासाच्या ज्ञानाचे स्वरूप अप्रत्यक्ष प्रकाराचे असल्याने कागदपत्रांवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते.[१] इतिहासकाराच्या बाबतीत पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे अज्ञान. अज्ञानामुळे सगळे कसे सुलभ आणि सुबोध होऊन जाते. अज्ञानामुळे निवडणे आणि वगळणे ही कामे साधली जातात. प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासावर लेखन करणाऱ्या पारंगततेचा मला कधी कधी हेवा वाटतो. पण या विचाराने दिलासाही वाटतो, की ते आपल्या विषयात इतके पारंगत आहेत, कारण आपल्या

विषयातील त्यांचे अज्ञानही तसेच मोठे आहे. आधुनिक काळाच्या इतिहासकाराला अशा प्रकारच्या अंतर्रचित अज्ञानाचा कसलाही फायदा मिळत नाही. त्याला स्वत:लाच या आवश्यक अज्ञानाची मशागत करावी लागते.[२] इतिहासाविषयक ग्रंथाची आद्य भाषांतरे त्यांच्या मूळ संहितांची संक्षिप्त रूपांतरे होती व त्यातील बहुतेक बखरवजा गद्यात लिहिली असायची. इ.स. १८६० च्या दशकात भारतविद्याविषयक संशोधनाबद्दलच्या वाढत्या अभिरूचीमुळे व शासकीय पाठबळामुळे हाती घेतलेल्या संस्कृत हस्तलिखितांसाठीच्या शोधामुळे, पुण्यातील डेक्कन कॉलेजसारख्या नव्या संस्थांमधील युरोपीयन भारतविद्यातज्ञांनी आणि संस्कृत तज्ज्ञांनी संहिताचे 'शुध्दीकरण' वा त्यांना संस्कारित करण्याच्या जुन्या लेखन पध्दतीचा छेद दिला. उलट, पौर्वात्यवादी ज्ञानसाधनेचा एक भाग म्हणून या अभ्यासकांनी काही नवीन चिकित्सा पध्दती रूजु केल्या. 'मूळ' हस्तलिखित व त्याचा कर्ता, तसेच उद्धते, अवतरण व हस्तलिखितांच्या प्रत्येक वेगवेगळ्या पाठांतरांची, त्यांच्या वेगवेगळ्या संपादनांच्या व भाष्यांच्या विशिष्ट तारखांची आणि त्यांच्या प्रतिलेखनिकांची काळजीपूर्वक नोंद ठेवून मूळ संहितेशी प्रामाणिक राहण्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले.[३]

**इतिहासाचे पुनर्लेखन :-**

गेल्या दीडशे-दोनशे वर्षात झालेले लिखाण प्रामुख्याने काही विशिष्ट वैचारिकतेतून झालेले असल्याने आज वर्तमान आम्हाला अभिप्रेत असलेल्या वैचारिकतेतून गतकाळ धुंडाळला जावा व इतिहासाचे पुनर्लेखन व्हावे हा विचारही अलीकडे प्रभावी बनत चालला आहे. हा विचार राष्ट्रवादी परंपरेचा प्रकट अविष्कार आहे. या परंपरेमागची वैचारिक भूमिका अशी की, पाश्चिमात्य इतिहासकारांनी लिहिलेला, संशोधिलेला सारा भारतीय इतिहास हा पूर्वगृहदूषित आहे. वसाहती दृष्टिकोनातून भारतीयांना कमी लेखण्याच्याच दृष्टीने लिहिला आहे. अनेक अज्ञात दुवे त्यांनी मुद्दाम शोधलेलेच नाहीत. ज्ञात अशा इतिहासाचेही त्यांनी विकृतीकरनच केले आहे. भारताचा गौरवशाली भूतकाळ रेखाटणारा असा इतिहास पुन्हा लिहावा इतिहासलेखनाचा राष्ट्रवादी विचार प्रवाह तसा नवा नाही. १९ व्या शतकात उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रवादी विचारांनी भारावलेले संशोधकांनी भारताच्या भूतकाळाचा धांडोळा घ्यायला सुरूवात केली होती. पाश्चिमात्य इतिहासकारांचे इतिहास लेखन काही जसेच्या तसे स्वीकारले गेले नाही.[४] पाश्चिमात्याच्या ज्ञानाने भारावलेल्या त्या पिढीतल्या लोकांनीदेखील शास्त्रशुध्द पध्दतीचा वापर करून, साधारणपणे इतिहासाचे पुन:संशोधन केले आणि आपले संशोधित लिखान इंग्रजी ग्रंथाच्या रूपाने मांडले. या काळातील इतिहास लेखनाचे दोन प्रवाह स्पष्टपणे दिसतात. एक प्रवाह पाश्चात्य अभ्यासकाचा व संशोधकांचा, दुसरा प्रवाह भारतीय अभ्यासकांचा व संशोधकांचा व्हेन्सन्ट स्मिथ, एच.जी. वेल्स यासारख्या इतिहासकारांनी प्राचीन भारताचा इतिहास लिहिला. ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापिठांनी इतिहासलेखनात सिंहाचा वाटा उचलला. पण त्याचबरोबर डॉ. यू.एन. घोषाल, डॉ. काशीप्रसाद जयस्वाल, डॉ. मुजुमदार, डॉ. भांडरकर यांसारख्या अनेक इतिहासकांनी प्राचीन भारताचा इतिहासाचा वस्तुनिष्ठ धांडोळा घेतला. हे एक प्रकारचे इतिहासाचे पुनर्लेखनच होते. त्यातूनच प्राचीन भारतातील लोकशाही परंपरा, गणराज्य पध्दती, प्राचीन राजनिती विचार या सर्व गोष्टी प्रकाशात आल्या. हे सर्व लिखाण इंग्रजीतून झाल्यामुळे ते जगभर वाचले गेले. भारतीय इतिहास लेखनात साम्यवादी विचारांचा प्रभाव आधिक्याने जाणवू लागला. त्याचाही इतिहास पुनर्लेखनाचा प्रयत्न सूरू झाला आणि याच काळात राष्ट्रवादी विचारांचा आग्रह धरून भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन करण्यात येऊ लागले. प्रखर राष्ट्रवादी विचारांचा आग्रह धरणाऱ्या पक्षाने इतिहास पुनर्लेखनाची आपल्या पातळीवर एक चळवळच उभी केली आहे. इतिहास संशोधन लेखन किंवा पुनर्लेखन हा

प्रकार राजकीय चळवळीच्या धर्तीवर करता येत नसतो. इतिहास संशोधन हे शास्त्र आहे. इतिहासाच्या साधनांचा धांडोळा घेणे हेही एक तंत्र आहे. उपलब्ध साधनांची चिकित्सा पुनर्परीक्षण हे करण्यासाठी त्या क्षेत्रात गती असणारे अभ्यासक लागतात याची जाणीव होऊ लागली आहे व इतिहास पुनर्लेखनाचे हे कार्य गतिमान होताना दिसते. [५]

इतिहासाचे पुनर्लेखन करावे का? तसे करणे शक्य आहे का? असे प्रश्न इतिहासाच्या क्षेत्रात उपस्थित केले जातात. ह्या प्रश्नाचे प्रत्यक्ष संबंध इतिहास विषयाच्या स्वरूपाबाबतच्या धारणेशी आहे. इतिहास म्हणजे गतकाळातील मानवी जीवनात घडणाऱ्या घडामोडींचा आलेख आहे, आणि गतकाळ अपरिवर्तनीय आहे, तर गतकालीन घडामोडीचा एकदा तयार केलेला आलेख बदलू शकाते का? तो जर बदलणारा आलेख नसेल तर एकाच ऐतिहासिक विषयावर पुन्हा पुन्हा लिहिणे निरर्थक, नरिस व अप्रस्तुत ठरणार नाही का? इतिहास लेखन ही शास्त्रीय प्रक्रिया आहे. सत्यदर्शन हा इतिहासाचा आत्मा आहे, घडून गेलेल्या गोष्टींचे प्रत्यक्ष सत्यदर्शन हे इतिहासाचे स्वरूप आहे, ही प्रत्यक्षवादी इतिहासकारांनी वैचारिक धारणा पूर्णत: स्वीकारली तर पुनर्लेखनाची गरज नाही असे म्हणावे लागेल. परंतु वास्तवात असे घडत नाही. एकाच ऐतिहासिक विषयावर अनेक ग्रंथ लिहिलेले आढळतात. म्हणजे इतिहासाचे पुनर्लेखन होते. इतिहासाच्या क्षेत्रातील विशेषज्ञ प्रस्थापित निष्कर्षांचे तपशिल वारंवार, सतत तपासून त्यावर पुनर्विचार करतात व त्यात सुधारणा करतात. प्रा. जी.एन. क्लार्कच्या मार्मिक विधानात आढळतो. (Historical knowledge is built up by specialists who perpetually revise and correct the details or accepted conclusions)

१) इतिहासाच्या पुनर्लेखनाची व संशोधनाची प्रक्रिया अखंड चालणारी आहे. संशोधकांनी एखाद्याविषयाचे संशोधन केले, याचा अर्थ त्या विषयाबाबतचे सर्व पुरावे त्याला उपलब्ध झाले असा होत नाही. अनेकदा काही पुरावे त्याच्या आवाक्या बाहेरचे असतात. त्यामुळे हाती पडलेल्या पुराव्याच्या आधारे तो लेखन करतो, कालांतराने त्याला न सापडलेले पुरावे दुसऱ्या एखाद्या संशोधकाला मिळते म्हणजे तो लिखित इतिहासाचा पुनर्विचार करतो.

२) कधी कधी ज्या पुराव्यांच्या भक्कम आधारावर लिखाण झाले आहे अशी धारणा असते, त्या पुराव्यांच्या भक्कमपणा विषयी त्यांच्या विध्वसनीयते विषयी शंका निर्माण होते. त्यामुळे नव्या पुराव्याच्या आधारे पूर्वीचे लिखान तपासून पाहण्याची गरज निर्माण होते.

३) कधी इतिहासाला सहाय्यकारी असणाऱ्या ज्ञानशाखांच्या विकासाबरोबर नव्या नव्या संशोधन प्रक्रिया प्रचलित होतात. उदा:- पुरातत्व, नाणेशास्त्र, लिपीशास्त्र, पदार्थविज्ञान व रसायणशास्त्र इत्यादी अभ्यासशाखांच्या विकासामुळे इतिहासाला नवे पुरावे उपलब्ध होतात. उदा:- कर्बत १४ डेटिंग प्रक्रियेमुळे प्राचीन अवशेषांचा काळ निर्धारित करण्यास मदत होते.

४) अनेकदा वेगवेगळे इतिहासकार एकाच घटनेकडे भिन्न दृष्टिकोणातून पाहतात. त्या घटनेचे वेगळे स्पष्टीकरण देतात. काळानुसार इतिहासलेखकाच्या मानसिकतेत बदल होतो, त्याची वैचारिक धारणा, श्रध्दा, जीवनमूल्ये बदलतात. तो ज्या काळात राहतो त्या काळातील प्रचलीत विचार प्रवाहाचा प्रभाव त्याच्या वैचारिक धारणांवर होणे स्वाभावीक असते. अभिजनांनी अभिजनांसाठी लिहिलेले इतिहास आहेत आणि म्हणून दुर्लक्षित वंचित समाजगटांचा इतिहास लिहिणे निकडीचे आहे, डॉ. रणजीत गुहा सारख्या ख्यातनाम इतिहासकारांचा दावा याच गटात मोडतो. याच दृष्टीने रॉबिन कोलिंगवूर्ड इतिहासाच्या कार्याविषयी व त्यातील साराविषयीची प्रत्येक युगाची

विशिष्ट कल्पना असते. (Every age has its own peculiar conception or the essence and task of History) आणि म्हणून प्रत्येक काळाने आपला इतिहास तपासून लिहिण्याची गरज आहे असे म्हणतात.[६]

५) गतकाळाची पुनर्निमिती करणारा इतिहासकार कितीही वस्तुनिष्ठ असला, नि:पक्षपातीपणे गतकाळाचे वर्णन करू इच्छित असला, तरी त्याचे व्यक्तिमत्व, त्याची जीवनमूल्ये, त्याचे पूर्वग्रह त्याच्या लिखानात अभावितपणे डोकवल्याखेरीज राहत नाही. त्यामुळे इतिहास लेखणातील अर्धछटा बदलतात. मिल साम्राज्यवादी इतिहास दृष्टिकोन तरी फिलिप्स सारखे समतोल दृष्टीचे इंग्रज इतिहासकार भारताबाबत सहानुभुतीची दृष्टी व्यक्त करतो. त्यामुळे एकाच विषयावरील वेगवेगळ्या इतिहासकारांनी केलेले पुनर्लेखन रोचक ठरते.

६) प्रत्येक राष्ट्राची मूलभूत वैशिष्ट्ये तेथील नागरिकांना अधिक चांगली परिचित असल्यामुळे त्या राष्ट्राचा रहिवासी त्या मातीत, त्या संस्कृतीत वाढलेला लेखक त्या राष्ट्राच्या इतिहासाला न्याय देऊ शकतो. राष्ट्रा राष्ट्राप्रमाणे जीवनमूल्य बदलतात, याच दृष्टीने प्रत्येक देशाचा इतिहास तेथील इतिहासकाराने लिहावा असे मत अलीकडे व्यक्त केले जाते.

७) एखाद्या ऐतिहासिक घटनेची कारणमीमांसा करताना किंवा त्या घटनेचे स्पष्टीकरण देताना त्या घटनेमागील कारणांची वर्गवारी इतिहासकार करीत असतो आणि अनेक कारणांमधून एखद्या कारणाला अग्रक्रम देऊन त्या आधारे कारणांची मालिका तयार करीत असतो. त्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक आहे. अनेक घटनेची वेगवेगळी मीमांसा भारतीय इतिहासकार करताना आढळतात. इतिहासाच्या अशा पुनर्लेखनाची निश्चितच आवश्यकता असते. कारण त्यामुळे विषयाचे भिन्न पैलू अधोरेखित होतात.

८) एखाद्या घटनेबाबत उपलब्ध असलेले सर्व पुरावे तपासताना त्यातील सर्व दुवे हाती येतीलच असे नाही. काही दुवे संदिग्ध, अगर अस्पष्ट वाटतात. तर काही ठिकाणी लहानशी पोकळी आहे असे वाटते. ती भरून काढणे इतिहासकाराचे कर्तव्य असते. अशा स्थितीमुळे इतिहासाच्या पुनर्लेखनाला वाव मिळतो. प्रत्येक इतिहासकार आपल्या बौध्दिक व मानसिक क्षमतेनुसार, वैचारिकधोरणानुसार कल्पनाशक्तीच्या मदतीने सुटे दुवे सांधतो. अशा वेळी कर्मनिष्ठेचा धागा पक्केपणे हातात धरून कल्पनाशक्तीचा वापर करण्याचे पथ्य त्याला पाळावे लागते. प्रत्येक इतिहासकाराच्या कल्पनाशक्तीचा वापर वेगवेगळ्या प्रकारे होत असल्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन करण्यास संधी मिळते. यामुळे मोठ्या राज्यक्रांत्या, इतिहास प्रसिध्द युध्दे, राष्ट्रीय उठाव यासारख्या विषयावरील वेगवेगळ्या इतिहासकारांचे ग्रंथ रोचक, वाचनीय व उद्‌बोधक ठरतात.[७]

**निष्कर्ष :**

१) इतिहासाचे पुनर्लेखन केवळ शक्य आहे एवढेचे नसून, ते आवश्यक आहे.

२) नव्या ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे पूर्वीचे लिखान तपासून पाहता येते.

**सारांश :**

इतिहासात तर्कशुध्दपणा, सुसंगतपणा आणण्यासाठी घटना प्रसंगाची योग्य ती मांडणी करण्यासाठी पुनर्लेखनाची आवश्यकता आहे. तसेच मानवी जीवनाचे विकासाचे नियम शोधण्यासाठी ऐतिहासिक चिकित्सेतून बुध्दिवादी विचारांचा शोध घेण्यासाठी पुनर्लेखनाची गरज आहे इतिहास विषयाचे आणि इतिहासलेखन प्रक्रियेचे स्वरूप लक्षात घेता. इतिहास

संशोधन, ऐतिहासिक सत्याचा पुनर्विचार ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. तसेच इतिहास लेखकाची मानसिकता, वैचारिक बैठक, त्याचे पूर्वगृह व्यक्तिमत्व या बाबीही लेखन प्रक्रियेतील महत्वाचे घटक असतात आणि म्हणून इतिहासाचा पुनर्विचार आणि पुनर्लेखन करणे व्यासंगी इतिहास समीक्षकांच्या मतांनुसार आगत्याचे ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात व्यापकता आणि विविधता येते. आणि वाचकांच्या ज्ञानाचे क्षितिजही विस्ताराने दिसते.

**संदर्भ सूची : -**


१) डॉ. सरदेसाई बी.एन., इतिहास लेखनपध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, जानेवारी २००५, पृ.क्र. २०

२) प्रा. लेले वि.गो., (अनुवाद), इतिहास म्हणजे काय? (ई.एच.कार) कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८७, पृ.क्र. ११

३) इतिहासलेखन मीमांसा, समाज प्रबोधनपत्रिका खंड- १, लोकवाङ्मय मह, मुबई, प्रथम आवृत्ती, मार्च २०१०, पृ.क्र. १५७

४) डॉ. देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, दुसरी आवृत्ती, ०१ जानेवारी २००२, पृ.क्र. ३४८

५) कित्ता, पृ.क्र. ३४९

६) डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, ०२ ऑक्टोंबर २००५, पृ.क्र. ५२

७) कित्ता, पृ.क्र. ५३


International Research Journal of Humanities and Interdisciplinary Studies IRJHIS